Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

Teachingninja.in

# MPSC

## Previous Year Paper

### Group C Marathi (Clerk-Typist) 2015

Teachingninja.in

'अधुलेखकलेखक मराठी'
दि : 26/7/2015

# A

**2015**

CODE : **CO6**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
प्रश्नपुस्तिका BOOKLET NO. 102121

**चाळणी परीक्षा/SCREENING TEST**
**मराठी भाषा व बुद्धिमापन चाचणी**

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | |
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in


Teachingninja.in

1. एका समांतरभुज चौकोनाचे क्षेत्रफळ 1080 चौ.मी. असून त्याचा पाया 120 सेमी असल्यास त्याची उंची किती ?

(1) 8.5 (2) 9 (3) 9.3 (4) 10

---

2. प्रश्न चिन्हाच्या जागी येणारा अंक कोणता ?




(1) 272 (2) 196 (3) 256 (4) 270


---

3. जर $\frac{a}{b} = \frac{3}{4}$ आणि $8a + 5b = 22$ असेल तर 'a' ची किंमत काढा.

(1) $\frac{3}{2}$ (2) $\frac{2}{3}$ (3) 1 (4) 0

---

4. प्रश्न चिन्हाच्या जागी येणारा अंक कोणता ?




(1) 420 (2) 400 (3) 361 (4) 324

---

5. 12% दराने ₹ 850 चे ₹ 408 सरळव्याज येण्यास किती वर्ष लागतील ?

(1) 5 वर्ष (2) 6 वर्ष (3) 12 वर्ष (4) 4 वर्ष

---

6. खालील वाक्यांपैकी संकेतार्थी वाक्य कोणती ?

(a) चांगला पाऊस पडतो आणि चांगले धान्य पिकते.

(b) तू मुंबईस केव्हा जाणार आहेस.

(c) जर माझ्याकडे पैसे असते तर तुला कपडे घेतले असते.

(d) गाडी वेळेवर सुटली असती तर आपण वेळेवर पोहचलो असतो.

वरीलपैकी **अचूक** पर्याय कोणते ?

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (c) आणि (d) फक्त (4) (a) आणि (c) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK




Teachingninja.in

7. 15 वर्षापूर्वी वडिलांचे वय मुलाच्या वयाच्या 6 पट होते. आज वडिलांचे वय मुलाच्या तिप्पट आहे. तर वडिलांचे आजचे वय किती वर्ष आहे?


(1) 60 वर्ष (2) 90 वर्ष (3) 45 वर्ष (4) 75 वर्ष

---


8. सोबतच्या "क्ष" प्रतिमेचे निरीक्षण करून ती पुढे दिलेल्या कोणत्या संचाचा घटक आहे याचा निर्णय निवडा.


क्ष

संच अ



संच ब



(1) "क्ष" ही प्रतिमा दिलेल्या दोन्ही संचांचा घटक आहे.

(2) "क्ष" ही प्रतिमा फक्त "अ" या संचाचा घटक आहे.

(3) "क्ष" ही प्रतिमा फक्त "ब" या संचाचा घटक आहे.

(4) "क्ष" ही प्रतिमा दिलेल्या कोणत्याही संचाचा घटक नाही.

---

9. विसंगत घटक निवडा.

AZBY, CXDW, EVFG, GTHS


(1) AZBY (2) CXDW (3) EVFG (4) GTHS


---


कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK


Teachingninja.in


**10.** खालील प्रश्नात आठ घरात विविध आकृती आहेत त्यामध्ये विशिष्ट संबंध आहे. तो संबंध शोधून प्रश्न चिन्हाच्या जागी आकृती निवडा :




(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

**11.** महाराष्ट्र पोलीस कर्तव्य बजावताना कोणत्याही त्यागास तयार होतात.

वरील वाक्याचा संदर्भ असलेला वाक्प्रचार कोणता ? खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा.

(1) जीवाचे रान करणे. (2) जीव गहाण ठेवणे.

(3) जीव खाली पडणे. (4) जीवाचा धडा करणे.

---

**12.** परवा महेशचा वाढदिवस आहे. पुढील आठवड्यात त्याच दिवशी गुढीपाडवा आहे. आज सोमवार आहे तर गुढीपाडव्यानंतर 20 व्या दिवशी कोणता वार असेल ?

(1) बुधवार (2) मंगळवार (3) गुरुवार (4) रविवार

---

**13.** $\dfrac{\dfrac{1}{2-\dfrac{1}{2}}}{1-\dfrac{1}{2}}$ = किती ?

(1) $\frac{3}{4}$ (2) $\frac{1}{4}$ (3) $\frac{1}{2}$ (4) $\frac{1}{3}$

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**14.** तर्कदृष्ट्या विसंगत समूह निवडा.

(1) ◷↻♥●☙◈◶◂☺❄☪❦❧▲ (2) ◂☺❄☪❦❧▲◷↻♥●☙◈◶

(3) ❧▲◷↻♥●☙◈◶◂☺❄☪❦ (4) ◂☺❄☪❦❧▲◶↻♥●☙◈◷

---

**15.** एका सांकेतिक भाषेत Anita is girl चा अर्थ 768 असा होतो. Girl and boy चा अर्थ 485 असा होतो तर Rahul is boy चा अर्थ 743 होतो. यावरून Rahul and Anita साठी पुढीलपैकी कोणते अंक येतील?

(1) 457 (2) 584 (3) 653 (4) 485

---

**16.** दोन संख्यांचा लसावि 315 असून मसावि 21 आहे. त्यापैकी एक संख्या 63 आहे. तर दुसरी संख्या कोणती?

(1) 108 (2) 67 (3) 105 (4) 103

---

**17.** 16 पेन व 19 पेन्सिलींची एकूण किंमत ₹ 134 आहे. तसेच 19 पेन व 16 पेन्सिलींची एकूण किंमत ₹ 146 आहे. तर एका पेनाची किंमत किती?

(1) ₹ 16 (2) ₹ 19 (3) ₹ 12 (4) ₹ 06

---

**18.** द्राक्षांपेक्षा स्ट्रॉबेरी महाग आहेत.

स्ट्रॉबेरी अंजीरांपेक्षा स्वस्त आहेत.

द्राक्षे व अंजीर यांच्या तुलनेत स्ट्रॉबेरी स्वस्त आहेत.

जर पहिली दोन विधाने सत्य असतील तर तिसरे विधान __________.

(1) निश्चितपणे सत्य आहे. (2) सत्य आहे असे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही.

(3) खात्रीने असत्य आहे. (4) खात्रीपूर्वक काही सांगता येणार नाही.

---

**19.** रिकामी जागा भरा.

0, ...., 8, 27, 64, 125


(1) 1 (2) 3 (3) 4 (4) 5

---


**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

20. सहसंबंध अभ्यासून रिकाम्या जागेसाठी उचित प्रतिमा निवडा.



(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

21. खालील शब्दाच्या 'विरुद्ध अर्थ असलेला शब्द' पर्यायी उत्तरांतील कोणता आहे ?

'भेद'

(1) समता (2) सजातीय (3) साम्य (4) सगुण

---

22. खालीलपैकी तत्सम शब्दांचा अचूक शब्दसमूह कोणता ?

(1) सरोज, कटी, हरीण, तनया
(2) ओष्ठ, कलश, आग, काज
(3) कर्ण, पर्ण, अरण्य, हस्त
(4) भ्राता, पवन, पियुष, समुद्र

---

23. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्ययाची खालीलपैकी अचूक उदाहरणे कोणती ?

(a) तो सतत वाईट वागतो.
(b) मी मोजके बोलतो.
(c) तो भरभर चालतो.
(d) जरा मोठ्याने बोल.

वरीलपैकी **अचूक** उदाहरणे असलेले पर्याय कोणते ?

(1) (a) फक्त
(2) (a) आणि (b) फक्त
(3) (a), (b) आणि (c)
(4) (c) आणि (d) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**24.** उन्ह तापू लागले की नागपूरचे लोक कानाला रूमाल बांधतात. या मिश्रवाक्यात प्रधान व गौण वाक्याचा खालीलपैकी **अचूक** पर्याय कोणता ?

| | प्रधान वाक्य | गौण वाक्य |
|---|---|---|
| (1) | उन्ह तापू लागले की | नागपूरचे लोक कानाला रूमाल बांधतात. |
| (2) | नागपूरचे लोक कानाला रूमाल बांधतात | उन्ह तापू लागले की |
| (3) | उन्ह तापू लागले की नागपूरचे लोक | कानाला रूमाल बांधतात. |
| (4) | नागपूरचे लोक कानाला रूमाल बांधतात | कारण उन्हाळा प्रचंड असतो. |

---

**25.** '**अ**' व '**ब**' गटातील पर्यायी उत्तरांतील कोणती जोडी सुसंगत आहे ते सांगा ?

| | अ - स्वदेशी भाषा | | ब - उदाहरणे |
|---|---|---|---|
| (a) | कानडी | (i) | ताळा, अनरसा |
| (b) | गुजराती | (ii) | भाकरी, विळी |
| (c) | तामिळी | (iii) | दलाल, डबा |
| (d) | तेलगू | (iv) | सार, मठ्ठा |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) - (iv) (2) (b) - (iii) (3) (c) - (i) (4) (d) - (ii)

---

**26.** खालील वाक्य वाचा व सूचनेप्रमाणे अचूक पर्याय ओळखा.

(a) खरा शेतकरी आपले वाण सर्वांना वाटतो.

(b) खरा शेतकरी आपले बियाणे सर्वांना देतो.

(c) खरा शेतकरी आपले बीज जपून ठेवतो.

(d) खरा शेतकरी आपले धान्य सर्वांना वाटतो.

वरीलपैकी कोणत्या वाक्यात विविध अर्थ असलेला शब्द आहे ?

(1) (a) फक्त (2) (c) फक्त

(3) (b) आणि (d) फक्त (4) (c) आणि (d) फक्त

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

27. पर्यायी उत्तरांतील 'निश्चयार्थक रीतिवाचक क्रियाविशेषण' असलेले शब्द कोणत्या पर्यायी उत्तरात आहेत ?

(1) जसे, तसे (2) खचित, खरोखर

(3) सावकाश, जलद (4) चमचम, बदाबद

---

28. खालील वाक्यातील 'विधेय पूरक' कोणते ?

'अर्जुनाने माशाला बाण मारिला'.

(1) बाण (2) मारिला (3) अर्जुनाने (4) माशाला

---

29. खालीलपैकी उपसर्गसाधित शब्दांचे अचूक शब्दगट शोधून उपसर्गसाधित शब्दगटांचे पर्याय कोणते ते निवडा ?

(1) प्रदेश, प्रताप, विजय, आक्रमण (2) अनुज, उत्तम, निर्बंध, सहिष्णू

(3) प्रयोग, संभव, प्रत्येक, रमणीय (4) विकास, चिरायु, आडनाव, जमाव

---

30. पर्यायी उत्तरांतून गटाबाहेरचा शब्द ओळखा.

(1) इच्छा (2) विपुलता (3) धनी (4) धना

---

31. 'चंद्र' या शब्दाचा समानार्थी शब्द वापरुन बनविलेले अचूक वाक्य कोणते ?

(a) त्याने सुधाकरास नमस्कार केला. (b) दिनकर गेला कुठे ?

(c) हिमांशू घरी परतला. (d) इंदूने पराजय स्विकारला.

वरीलपैकी **अचूक** पर्याय कोणते ?

(1) (a) आणि (c) फक्त (2) (b) आणि (d) फक्त

(3) (a), (c) आणि (d) फक्त (4) (b), (c) आणि (d) फक्त

---

32. पण तू आहेसना झालं तर अशी इकडे ये पाहू

वरील वाक्य चिन्हांचा वापर करून लिहिलेला खालीलपैकी **अचूक** पर्याय कोणता ?

(1) पण तू आहेसना ? झालं तर. अशी इकडे ये पाहू.

(2) पण तू आहेसना ! झालं तर, अशी इकडे ये पाहू !

(3) पण तू आहेसना. झालं तर ! अशी इकडे ये पाहू.

(4) पण तू आहेसना. झालं तर ! अशी इकडे ये पाहू ?

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

33. वाच् + हरि यांचा व्यंजनसंधी कसा होईल ? खालीलपैकी **अचूक** पर्याय कोणता ?

(1) वाचारि (2) वाच्यहरी (3) वाग्यहरि (4) वाग्हरि

---

34. खालीलपैकी पूर्णाभ्यस्त शब्दांचे शब्दगट कोणते ?

(a) येईयेई, काळीकाळी (b) किरकिर, बडबड

(c) बारीकसारीक, आंबटचिंबट (d) घाईघाई, ठायीठायी

वरीलपैकी **अचूक** पर्याय कोणते ?

(1) (a) आणि (c) फक्त (2) (b) आणि (d) फक्त

(3) (a) आणि (d) फक्त (4) (a), (c) आणि (d)

---

35. 'दंत्य वर्ण' कोणते ते सांगा ?

(1) क्, ख्, ग् (2) च्, छ्, ज् (3) ट्, ठ्, ड् (4) त्, थ्, द्

---

36. खाली दिलेल्या वाक्यांचे रचनेनुसार प्रकार कोणते ?

(a) आज पाऊस पडावा – केवलवाक्य

(b) पाऊस पडावा म्हणून – केवलवाक्य

(c) तू खेळ पण अभ्यास करत जा – संयुक्तवाक्य

(d) जो देशसेवा करतो तोच खरा देशभक्त – संयुक्तवाक्य

वरीलपैकी **अचूक** पर्याय कोणते ?

(1) (a) आणि (b) फक्त (2) (c) आणि (d) फक्त

(3) (a) आणि (c) फक्त (4) (b) आणि (d) फक्त

---

37. पूर्णाभ्यस्त नसलेला शब्द ओळखा.

(1) मधूनमधून (2) समोरासमोर (3) लाललाल (4) वटवट

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

38. वडिलांनी मुलाला शाळेत घातले या वाक्याचा प्रयोग कोणता ?

(1) अकर्तृक - भावेप्रयोग (2) कर्तृ - कर्म संकर प्रयोग

(3) कर्म - भाव संकर प्रयोग (4) कर्तृ - भाव संकर प्रयोग

39. 'चांदणे' या शब्दासाठी खालीलपैकी कोणते समानार्थी शब्द आहेत ?

(a) रजनी (b) कौमुदी (c) शशी (d) जोत्स्ना

वरीलपैकी कोणते पर्याय **अचूक** आहेत ?

(1) (a) आणि (c) फक्त (2) (b) आणि (d) फक्त

(3) (a), (c) आणि (d) (4) (b), (c) आणि (d)

40. खालील विधानातील 'विविध अर्थी शब्द' ओळखा.

दमयंती म्हणते, 'औषध नलगे मजला.'

(1) दमयंती (2) औषध (3) नलगे (4) मजला

41. मला राजाश्रय मिळाला होता पण राजकृपा मात्र माझ्या वाट्याला आली नव्हती. या वाक्यात उद्देश्य आणि विधेय कोणते ? खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा :

| | **उद्देश्य** | **विधेय** |
|---|---|---|
| (1) | राजाश्रय | मिळाला होता |
| (2) | राजाश्रय, राजकृपा | मिळाला होता, आली नव्हती |
| (3) | मला राजाश्रय मिळाला होता | माझ्या वाट्याला |
| (4) | वरीलपैकी एकही नाही | |

42. किती खराब आहे हे धान्य !

वरील वाक्याचा रचना प्रकार कोणता ?

(1) होकारार्थी (2) नकारार्थी (3) संकेतार्थी (4) विध्यर्थ

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

43. खालील जोडशब्दाचे पोटशब्द कोणते ?

'वाग्विहार'

(1) वाग् + विहार (2) वाञ् + विहार (3) वाङ् + विहार (4) वाक् + विहार

---

44. खालील वाक्यातील 'उद्देश्य विस्तार' कोणता ?

'आणखी एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.'

(1) सांगण्यासारखा (2) प्रसंग (3) आणखी एक (4) आहे

---

45. 'आ + अ' हे स्वर एकत्र येऊन बनलेला जोडशब्द पर्यायी उत्तरांतील कोणता आहे ?

(1) सूर्यास्त (2) देवालय (3) विद्यार्थी (4) महिलाश्रम

---

46. गर्दीमुळे गाड्या हळूहळू जात होत्या.

वरील वाक्यातील अविकारी शब्द कोणता ? खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा.

(1) गर्दी (2) हळूहळू (3) गाड्या (4) यापैकी एकही नाही

---

47. 'क्रियापदावरून एक गोष्ट दुसरीवर अवलंबून आहे, अशा प्रकारचा बोध होतो, तेव्हा त्यास __________ क्रियापद म्हणतात'. वरील वाक्यातील गाळलेला शब्द कोणता ?

(1) विध्यर्थी (2) संकेतार्थी (3) आज्ञार्थी (4) स्वार्थी

---

48. खालील पर्यायी उत्तरांतील 'इच्छा दर्शक भविष्यकाळ' असलेले विधान कोणते ?

(1) तू मदत देशील तर मी आभारी होईन. (2) सगळेच शहाणे कसे असतील.

(3) गुरुजी आत शाळेत असतील. (4) मला दोन रुपये हवे होते.

---

49. खालील वाक्यातील पर्यायी उत्तरांतील 'उद्देश्य' कोणते ?

'त्याचा थोरला भाऊ कॅरम चांगला खेळतो'.

(1) त्याचा थोरला (2) कॅरम चांगला (3) भाऊ (4) खेळतो

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

**50.** खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

'मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही'.

(1) मिश्र वाक्य (2) गौण वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) केवल वाक्य

---

**51.** खालीलपैकी विध्यर्थी वाक्य कोणते ? **अचूक** पर्याय निवडा.

(1) गणेश अभ्यासात पूर्ण लक्ष देतो. (2) सुमन धावण्यात पहिली यावी.

(3) ताडोबा अभयारण्यात वाघ आहेत. (4) तो काही संत नाही.

---

**52.** क्रियापदाच्या अर्थाप्रमाणे खालील वाक्याचा पर्यायी उत्तरांतील योग्य तो वाक्य प्रकार कोणता ?

'थोरले माधवराव गादीवर बसले.'

(1) आज्ञार्थी (2) स्वार्थी (3) विध्यर्थी (4) संकेतार्थी

---

**53.** पुढीलपैकी लिंगानुसार बदलणारी सर्वनामे कोणती ?

(a) मी, तू, स्वत: (b) तू, हा, कोण (c) जो, तो, काय (d) तो, हा, जो

वरीलपैकी **अचूक** पर्याय कोणते ?

(1) (a) आणि (b) फक्त (2) (c) आणि (d) फक्त

(3) (b) फक्त (4) (d) फक्त

---

**54.** 'तोंडीलावणे' कोणता समास होतो ?

(1) विभक्ती तत्पुरुष समास (2) अलुक् तत्पुरुष समास

(3) नञ् तत्पुरुष समास (4) उपपद तत्पुरुष समास

---

**55.** खालीलपैकी सिद्ध शब्द असलेला अचूक शब्दगट कोणता ? **योग्य** पर्याय निवडा.

(1) सोनार, मर्कट, न्हाणे इ. (2) झाड, लाकूड, दगड इ.

(3) चर्मकार, जाऊ, सेज इ. (4) पाटीलकी, मार, सैल इ.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**56.** खालील शब्दगटातील देशी शब्दांचा अचूक शब्दगट निवडा.

(1) ताई, किल्ली, तंबाखू (2) हापूस, फडनवीस, दारुबाज

(3) शाहीर, फणस, पगार (4) डोके, बाजरी, खुळा

---

**57.** तुम्ही स्वत: अथवा तुमचा भाऊ येऊ दे. या वाक्यातील विधेयविस्तार कोणता? खालीलपैकी **अचूक** पर्याय निवडा.

(1) स्वत:, तुमचा (2) तुम्ही, भाऊ

(3) येऊ दे (4) यापैकी एकही नाही.

---

**58.** खालीलपैकी तालव्य उच्चार असणारे वर्णगट कोणते?

(a) च्, छ्, ज् (b) त्, य्, द् (c) य्, श्, ञ् (d) ट्, ठ्, ण्

वरीलपैकी अचूक पर्याय कोणते?

(1) (a) आणि (b) फक्त (2) (c) आणि (d) फक्त

(3) (a) आणि (c) फक्त (4) (a), (b) आणि (c)

---

**59.** पर्यायी उत्तरांतून 'ई – आख्याताचा' क्रियापदाचा काळ कोणता ते सांगा?

(1) वर्तमानकाळ (2) भूतकाळ (3) रीतिभूतकाळ (4) भविष्यकाळ

---

**60.** समानार्थी शब्द ओळखा –

पारंगत __________.

(1) चलाख (2) तज्ज्ञ (3) निपुण (4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

61. तुम्ही चालत असताना तुमचे काका तुमच्यासमोर येऊन उभे राहिले. प्रकाशाची तिरिप पडल्यामुळे त्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. त्यांची लांबलचक सावली त्यांच्या पाठी पडली होती आणि तुमची सावलीही त्यांच्या सावलीवर पसरलेली होती. याचा अर्थ तुम्ही निश्चितपणे :

(1) संध्याकाळी पूर्व दिशेला जात होता.

(2) सकाळी पश्चिमेला जात होता.

(3) संध्याकाळी पूर्व दिशेला किंवा सकाळी पश्चिमेला जात होता.

(4) संध्याकाळी पूर्व दिशेला आणि सकाळी पश्चिमेला जात होता.

---

62. खाली दोन विधाने दिली आहेत, त्यावरून कोणता निष्कर्ष **सत्य** आहे ?

**विधाने :** (i) सर्व कामगार टायपिस्ट आहेत.

(ii) काही टायपिस्ट मुले आहेत.

**निष्कर्ष :** (i) सर्व मुले टायपिस्ट आहेत.

(ii) सर्व मुले कामगार आहेत.


(iii) काही टायपिस्ट कामगार आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (i) व (ii) सत्य (2) सर्व सत्य (3) सर्व चुकीचे (4) फक्त (iii) सत्य

---

63. खालील आकृतीतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या लिहा.




(1) 100 (2) 119 (3) 109 (4) 106

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

64. जर $x : y = 3 : 5$ आणि $y : z = 4 : 6$ तर $x : z =$ ?

(1) 5 : 2 (2) 2 : 6 (3) 2 : 5 (4) 3 : 5

---

65. पर्यायांतून खालील समानतेची उजवी बाजू निवडा.

$(25.732)^2 - (15.732)^2 = ?$

(1) 4.1464 (2) 41.464 (3) 414.64 (4) 4164.4


---


66. $e^0 = ?$


(1) 0 (2) 1 (3) e (4) − 0


---


67. प्रश्नचिन्हाच्या जागेसाठी उचित पर्याय निवडा.




(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

68. $\sqrt{10 + \sqrt{33 + \sqrt{1 + 8}}} = ?$

(1) $\sqrt{4}$ (2) $\sqrt{3}$ (3) 3 (4) 4

---

69. विसंगत घटक ओळखा.

ENIN, EVIF, RUOF, BMAL

(1) ENIN (2) EVIF (3) RUOF (4) BMAL

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

70. विसंगत संख्या असणारा पर्याय निवडा.

5306, 7568, 6389, 6366

(1) 5306 (2) 7568 (3) 6389 (4) 6366

---

71. खालील म्हणीचा अर्थ पर्यायी उत्तरांत कोणत्या पर्यायी उत्तरांत दिसून येतो ?

'बावळी मुद्रा देवळी निद्रा'.

(1) बावळट माणसे देवळाचा आश्रय घेतात.

(2) दिसण्यात बावळट पण व्यवहारात चतुर.

(3) बावळट लोकांना देवळात झोपेचे सोंग घेऊन निजावेसे वाटते.

(4) खरोखर खुळी माणसे व्यवहार चतुर नसतात का ?

---

72. जर KOE = 461, QEU = 719 तर 741 = ?

(1) EKQ (2) QKE (3) QEK (4) QMK

---

73. समजा आज 1 मार्च आहे. आणखी पाच दिवसांनी सोमवार येतो. हे चालू वर्ष लीप वर्ष आहे. तर मागील वर्षाच्या 1 डिसेंबरला कोणता वार होता ?

(1) बुधवार (2) मंगळवार (3) रविवार (4) सोमवार

---

74. जर $x = 3\frac{1}{5}$, $y = 2\frac{1}{5}$ तर $x + y = ?$

(1) $\frac{17}{10}$ (2) $\frac{26}{5}$ (3) $\frac{27}{5}$ (4) $\frac{27}{10}$

---

75. एका नेमबाजीच्या स्पर्धेत प्रत्येक अचूक नेमासाठी 8 गुण मिळतात व नेम चुकल्यास मिळालेल्या गुणातून 2 गुण कमी होतात. एका स्पर्धकाने 35 प्रयत्नात 200 गुण मिळवले तर त्याचे किती नेम बरोबर आहेत ?

(1) 25 (2) 27 (3) 30 (4) 23

---

76. जर MAT = 655100, DON = 207570 तर 25590 = ?

(1) RAE (2) EAR (3) RAM (4) RAQ

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**77.** एका रांगेत अनिता ही उजवीकडून 26 वी आहे आणि सुनिता डावीकडून 29 वी आहे. आता त्यांनी आपआपसात जागा बदलल्या, तेव्हा सुनिता ही डावीकडून 45 वी झाली तर अनिता उजवीकडून कितवी असेल?

(1) 42 (2) 40 (3) 46 (4) 32

---


**78.** खालील संख्याजोड्याच्या मालिकेत प्रत्येक संख्याजोडीतील दोन संख्यामध्ये एक विशिष्ट संबंध आहे. त्यावरून प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?




60 - 120, 210 - 336, 504 - ?

(1) 720 (2) 729 (3) 700 (4) 725

---

**79.** जाळी पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.



(1) 
(2) 
(3) 
(4) 

---

**80.** खालील तक्त्यात प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?

| | | |
|---|---|---|
| 15 | 257 | 17 |
| 12 | ? | 14 |
| 11 | 145 | 13 |

(1) 180 (2) 201 (3) 170 (4) 150

---

**81.** पर्यायी उत्तरांतील 'क्रियाविशेषणवाचक पूर्णाभ्यस्त शब्द' असलेले पर्यायी उत्तर कोणते?

(1) घर घर (2) जे जे (3) समोरासमोर (4) मधूनमधून

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

82. शारदीय पौर्णिमेत ताजमहल अधिकच देखणा दिसतो. या केवलवाक्यातील उद्देश्यविस्तार खालीलपैकी कोणता?

(1) शारदीय पौर्णिमेत (2) अधिकच देखणा

(3) ताजमहल (4) यापैकी एकही नाही.

---

83. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द कोणता?

(1) शांतता (2) शहाणा (3) मनुष्यत्व (4) सौंदर्य

---

84. तो म्हणाला की मी हरलो.

वरील वाक्यातील अधोरेखित अव्ययाचा प्रकार कोणता?

(1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय (2) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय

(3) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय (4) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

---

85. काही लोक वरदक्षिणा घेतात किंवा काही जण त्याचा संबंध स्त्रियांच्या वारसाहक्काशी जोडतात. या वाक्यातील विधेयविस्तार **अचूक** निवडा.

(1) घेतात, जोडतात (2) स्त्रियांच्या वारसाहक्काशी

(3) वरदक्षिणा, संबंध (4) काही जण

---

**खालील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 86 ते 90 या प्रश्नांची पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तरे लिहा -**

नवी पिढी म्हणजे आपण यच्चयावत तरुण पिढी म्हणतो, पण तसे कधी नसते. 1942 च्या स्वातंत्र्याच्या चळवळीतला माझा हा अनुभव आहे. देशातली सर्वच्या सर्व नवी पिढी एखाद्या कामात स्वत:ला बांधून घेते असे सहसा घडत नाही. महत्त्वाची आव्हाने येतात, त्यावेळी नवी पिढी कामासाठी पुढे सरसावते. तरुणांपुढे विधायक विचार, ध्येय कार्यक्रम ठेवला तर ते संघटितही होतात. मानवतावादी विचार त्यांच्या मनात रुजवला तर तरुणवर्ग अन्यायाविरुद्ध आणि दलितांच्या बाजूने उभा राहतो असे आजही आढळते. आजच्या तरुणांच्या ठिकाणीही नैतिक मूल्यांची चांगली जाण आहे, हाच याचा अर्थ.

ज्या प्रदेशात व ज्या काळात आपण राहत आहोत, त्यांच्या संदर्भात वस्तुस्थितीचा व घटनांचा अभ्यास करणे हे आवश्यक असे कर्तव्य आहे. प्रत्येक देशाला, किंबहुना देशातील प्रत्येक भागाला, त्याचे असे काही प्रश्न व गरजा असतात. नवीन रक्ताच्या तरुणांनी या प्रश्नांचा सखोल अभ्यास करुन ते सोडविण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे व अशा प्रकारे आपल्या प्रदेशातील लोककल्याणाच्या कार्याचा एक अविभाज्य व जिवंत घटक बनले पाहिजे. पूर्वीच्या काळी लोक विद्वान व व्यासंगी पुरुषांकडून मार्गदर्शकाची अपेक्षा करीत. आज विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या तरुण स्त्री-पुरुषांकडून अशा मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

आता जेव्हा मी एखाद्या खेड्यात जातो तेव्हा लहानपणचे खेडे सहसा समोर येत नाही. खेडे आता बदलत राहिले आहे. एक मात्र खटकते, महारवाडा आजही तो गावाच्या, खेड्याच्या बाहेरच उभा आहे. परिस्थितीच्या भिंती ढासळत गेल्या, वेशी उद्ध्वस्त झाल्या; पण जाती-जमातींच्या भिंती पडलेल्या नाहीत. भल्याभल्यांनी सुरुंग लावले, पहारी चालविल्या पण ते तट अजून उभेच आहेत. मांगांची मुले, मुली व स्त्रिया आजही वाखाच्या दोऱ्या वळीत, त्या तटाच्या बाहेर उन्हात उभ्या आहेत. त्याच त्या गवताने शेकारलेल्या झोपड्या आणि पाठीला लागलेली पोटं!

पूर्वी खेड्यातील सारीच माणसे परिस्थितीने बनविली होती. आज माणसे तिथली परिस्थिती बनवीत आहेत, भलीबुरी, शिक्षण त्यांच्या घरापर्यंत पोचले आहे. कुंभारी कौलाने घर शेकारणारे आता घरावर मंगलोरी तांबडी कौले चढवीत आहेत. मध्येच एखादे दुमजलीही दिसते. त्या दुमजलीच्या हिरव्या, निळ्या, गुलाबी भिंती लक्ष वेधून घेतात. एखाद्याच्या घरात ट्रान्झिस्टर गात असतो.

---

**86.** नवी पिढी कामासाठी केव्हा पुढे सरसावते ?

(1) कोणीतरी बोलावल्यानंतर.
(2) अगदीच हातघाईवर आल्यानंतर.
(3) महत्त्वाची आव्हाने आल्यानंतर.
(4) निमित्तमात्र कामाचे सोंग करण्यासाठी.

---

**87.** तरुण सुसंघटित केव्हा होतात ?

**विधाने :**

(a) विधायक विचार तरुणांच्यापुढे ठेवल्यास.

(b) तरुणांच्यापुढे स्वप्नरंजनात्मक विचार ठेवल्यास.

(c) ध्येयपूर्तीचा कार्यक्रम तरुणांच्यापुढे ठेवल्यास.

(d) दिशाहीन, न्यायाविरुद्ध विचार तरुणांच्यापुढे ठेवल्यास.

पर्यायी उत्तरांतून **योग्य** उत्तरांची निवड करा –

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b), (c) बरोबर
(3) फक्त (c), (d) बरोबर
(4) फक्त (a), (c) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

88. खालील विधाने पहा :

(a) पूर्वी खेड्यातील सारीच माणसे परिस्थितीने बनविली होती.

(b) आज माणसे तिथली परिस्थिती बनवीत आहेत.

पर्यायी उत्तरांतून **योग्य** पर्यायी उत्तर सांगा :

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) (a), (b) बरोबर (4) (a), (b) चूक

---

89. कोणते तट अजूनही उभे आहेत ?

(1) वेशींचे (2) पुढारलेल्या समाजाचे

(3) जाती-जमातींचे (4) परिस्थितीच्या भिंतींचे

---


90. आजच्या तरुणांच्या ठिकाणी कोणती चांगली जाण आहे ?

(1) वारेमाप हौस करण्याची. (2) नैतिक मूल्यांची.

(3) मानवतेपासून दूर जाण्याची. (4) कोणतीही परिस्थिती न स्वीकारण्याची.

---

91. आकृतीतील त्रिकोणांची संख्या किती ?



(1) 28 (2) 26 (3) 24 (4) 30

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

92. एका सुसम अष्टकोनी टेबलावर भारताचा नकाशा पसरलेला आहे. तो ठेवताना काळजी न घेतल्याने नकाशाची दक्षिण दिशा ही भौगोलिक ईशान्य दिशेशी जुळली आहे. लीना, हीना, नविना व उना या चारही विद्यार्थिनी टेबलाभोवती एकमेकींच्या नेमक्या समोर उभ्या राहून नकाशा पाहत आहेत. लीनाचे तोंड उत्तरेकडे असून तिच्यासमोर नविना आहे तर डावीकडे हीना आहे. तर उनासमोर भारताचा कोणता भाग आहे ?

(1) बंगालचा उपसागर (2) हिन्दी महासागर (3) अरबी समुद्र (4) हिमालयाच्या रांगा

---

93. SUREK ची आरशातील प्रतिमा दर्शवणारा पर्याय निवडा.

(1) ꓘƎЯՈƧ (2) ƨUЯƎꓘ (3) ꓘƎRUƧ (4) ꓘƎЯUƧ

---

94. प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.

C2N : F9Q : : T5J : ?

(1) W126M (2) W25M (3) W125N (4) W125M

---

95. एका वर्तुळाकार मैदानाचा व्यास 1400 सेमी आहे. तर त्या वर्तुळाकार मैदानाचे क्षेत्रफळ किती ?

(1) 1440000 सेमी$^2$ (2) 1540000 सेमी$^2$ (3) 1640000 सेमी$^2$ (4) 1450000 सेमी$^2$

---


96. अ, ब, क, ड आणि इ या व्यक्ती गप्पा मारत बसल्या आहेत. यात एक शेतकरी, एक पशुपालक आणि एक पक्षी पालक आहे. अ आणि ड या दोन व्यक्ती अविवाहित स्त्रिया आहेत व कोणताही व्यवसाय करत नाहीत. यात एक जोडपे असून त्यातील इ ही व्यक्ती पुरुष आहे. ब हा अ चा भाऊ असून पशु वा पक्षीपालक नाही. तर यांच्यातील शेतकरी कोण ?





(1) ब (2) क

(3) अ (4) दिलेली माहिती पुरेशी नाही.

---

97. "क्ष" प्रतिमेतील आकार समाविष्ट करणारी पर्यायी प्रतिमा निवडा.


"क्ष"

(1)  (2)  (3)  (4) 

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

98. एका संख्येच्या दुपटीतून 2 वजा करून येणारी वजाबाकी त्याच संख्येच्या तिपटीत 5 मिळवून येणाऱ्या बेरजे इतकी आहे. ती संख्या शोधा.

(1) −5 (2) −7 (3) 5 (4) 7

---

99. पुढे दिलेली विधाने सत्य मानून (a) आणि (b) या निष्कर्षांबाबत निर्णय घेणारा पर्याय निवडा.

**विधाने :** सर्व पिंपळ वनस्पती आहेत. सर्व वनस्पती बांबू आहेत.

**निष्कर्ष :** (a) सर्व बांबू वनस्पती आहेत.

(b) सर्व पिंपळ बांबू आहेत.

(1) फक्त (a) सत्य आहे. (2) फक्त (b) सत्य आहे.

(3) (a) किंवा (b) सत्य आहे. (4) (a) आणि (b) दोन्ही सत्य आहेत.

---

100. खालील संख्यामालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते पद येईल ?

1, 5, 3, 5, ? 5, 7, 5, 9, 5.

(1) 5 (2) 3 (3) 4 (4) 7

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्रश्न क्र. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" हे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Teachingninja.in